**विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय संस्थांमध्ये "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" यांची नियुक्ती करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२२/प्र.क्र.३१२/म.शि.-१**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०४ जानेवारी, २०२३.

वाचा: (१) विद्यापीठ अनुदान आयोगाचे अ.शा. पत्र क्र. ९-१/२०१०/(PS/Misc) PT-I, दिनांक ३० सप्टेंबर, २०२२

(२) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्रमांक : उशिसं-२०२२/टेबल क्र.२/प्रशा-१/ १४५३३, दिनांक २८ डिसेंबर, २०२२.

**प्रस्तावना :-**

विद्यापीठ अनुदान आयोगाने नवीन शैक्षणिक धोरणातील शिफारशीनुसार उद्योग आणि विविध व्यावसायिक क्षेत्रातील तज्ज्ञांना शिक्षणाच्या प्रवाहात सहभागी करुन घेण्यासाठी 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' हे नवीन पद निर्माण केले आहे. त्यानुसार संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक ३०.०९.२०२२ च्या पत्रान्वये नवीन शैक्षणिक धोरण २०२० मधील शिफारशीच्या अनुषंगाने "guidelines for engaging professor of practice in universities and colleges" दिलेल्या आहेत.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार, शिक्षणात परिवर्तनात्मक बदल घडवून आणण्यासाठी कौशल्यावर आधारित शिक्षणावर भर देणे आवश्यक आहे. उच्च शिक्षणात औद्योगिक क्षेत्राच्या गरजा ओळखून नियमित शिक्षणात व्यवसाय शिक्षण अंतर्भूत करणे, त्यासाठी औद्योगिक / शैक्षणिक संस्थांचा सहयोग यासाठी 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' हे पद उपयुक्त ठरणार आहे. त्यानुसार संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी संदर्भाधीन क्रमांक २ येथील पत्रान्वये, प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिसेस इन युनिव्हर्सिटी ॲण्ड कॉलेजेस' अंतर्गत शासकीय महाविद्यालये / संस्था यांमध्ये उद्योग व विविध व्यावसायिक क्षेत्रातील तज्ज्ञांना शिक्षणाच्या प्रवाहात सहभागी करुन घेण्यासाठी प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिसेसचे धोरण निश्चित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

त्यानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्थांतील प्राध्यापकांच्या मंजूर पदांच्या १०% च्या प्रमाणात "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ३०.०९.२०२२ च्या पत्रान्वये, नवीन शैक्षणिक धोरण २०२० मधील शिफारशीच्या अनुषंगाने दिलेल्या "guidelines for engaging professor of practice in universities and colleges" नुसार, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय संस्थांमधील प्राध्यापकांच्या मंजूर पदांच्या १०% च्या प्रमाणात "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. त्यानुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय संस्थांमध्ये "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" यांची नियुक्ती करण्याबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात येत आहेत :-

**(अ) "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" नियुक्तीकरिता पात्रता** -

१. अभियांत्रिकी, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, प्रसारमाध्यम, समाजशास्त्र, साहित्य, स्थापत्यसेवा, समाज विकास, पंचायतराज, ग्रामीण विकास, जलसंवर्धन, सेंद्रीय शेती, न्यायिक

व्यवसाय, नगररचना, लिंगाधारीत अर्थसंकल्प/ नियोजन (Gender Budgeting/ plan), आदिवासी विकास तसेच लोकप्रशासन इ. विविध क्षेत्रात वैशिष्टयपूर्ण योगदान दिलेल्या तज्ञ व्यक्तींपैकी, ठराविक व्यवसायामध्ये किमान १५ वर्षांचा अनुभव (प्राधान्याने वरिष्ठ पातळीवरील सेवा/अनुभव) असलेल्या व्यक्ती "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" पदाकरिता पात्र असतील.

२. प्राध्यापक पदाकरिता विहित करण्यात आलेल्या अर्हता "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" करिता आवश्यक असणार नाहीत. तथापि, सदर पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी ठराविक कौशल्ये आत्मसात केलेली असावीत.

३. उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस ची संख्या मंजूर पदांच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त असू नये.

**(ब) कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या:-**

१. सदर योजनेअंतर्गत नियुक्त प्राध्यापकांना किमान एक विषय शिकविणे आवश्यक आहे. सदर प्राध्यापकांनी तिसऱ्या व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना शिकविणे व नियमित प्राध्यापकांकरिता नेमून दिल्याप्रमाणे शैक्षणिक भार घेणे आवश्यक राहील. तसेच विद्यार्थ्यांचे प्रकल्प (प्रोजेक्ट), मूल्यमापन व सत्र काम पूर्ण करणे आवश्यक राहील.

२. अभ्यासक्रमात गरजेनुसार बदल करणे आणि नवीन अभ्यासक्रम निर्माण करणे (Course Design) यामध्ये सहभागी होणे.

३. संस्थेच्या धोरणानुसार नवीन अभ्यासक्रम निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांना शिकवणे.

४. विद्यार्थ्यांना संशोधन आणि स्वयंरोजगार याबाबत प्रोत्साहन देणे.

५. शैक्षणिक संस्था आणि उद्योगसमूह यामधील परस्पर संबंध वृध्दींगत करणे.

६. संस्थेतील अध्यापकांसोबत संयुक्तपणे संशोधनपर प्रकल्प राबविणे तसेच उद्योगांना सल्लागार सेवा पुरविणे (Consultancy Services) संबंधी कामे.

७. संस्थेच्या अध्यापकांसोबत संयुक्तपणे कार्यशाळा (workshop), परिसंवाद (Seminar), विशेष व्याख्याने या सारखे उपक्रम राबविणे.

**(क) सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१. सदर योजनेअंतर्गत प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस या पदावरील नियुक्त्या ठराविक कालावधीकरिता असतील.

२. सदर नियुक्त्यांमुळे संस्थांमधील मुळ मंजूर पदांच्या आकृतीबंधामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. तसेच सदर पदांमुळे नियमित अध्यापकांच्या नियुक्त्यांवर कोणत्याही प्रकारचा परिणाम होणार नाही.

३. सदरच्या नियुक्त्या नियमित अध्यापकीय सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांमधून करता येणार नाहीत.

**(ड) नियुक्तीचे प्रकार :-**

विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केल्यानुसार "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" या पदावरील नियुक्त्या पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारे करता येतील :-

१. औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांचा प्रायोजक निधी (Funded By Industries)

२. उच्च शिक्षण संस्थांच्या स्वत:चा उपलब्ध निधी (HEI- Own Resources)

३. मानधन तत्त्वावर (Honorary basis)

प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस या पदाकरिता येणारा खर्च उद्योग प्रायोजित/ संस्थास्तरावर उपलब्ध निधीतून भागविण्यात येईल. याबाबत शासनाकडून कोणत्याही प्रकारे निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही.

**(इ) "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस" या पदाकरीता निवड करण्याची पध्दत :-**

१. विद्यापीठाचे कुलगुरू/ संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य वृत्तपत्रामध्ये जाहीरात देऊन प्रख्यात तज्ञांकडून "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस" पदांसाठी नामांकन मागवतील.

२. इच्छुक व पात्र असलेले इतर तज्ञ यांचे देखील नामांकन करता येऊ शकेल किंवा तज्ञ व्यक्ती त्यांच्या वैयक्तिक माहितीसह उच्च शिक्षण संस्थेस भरीव योगदानाच्या माहितीसह नामांकन अर्ज विद्यापीठाचे कुलगुरू/ संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य यांना सादर करू शकतील.

**(फ) नियुक्तीकरिता निवड समिती :-**

१. संस्थेतील दोन वरिष्ठ प्राध्यापक (संबंधित विषयातील) आणि संस्थेबाहेरील एक प्रख्यात तज्ञ सदस्य यांची निवड समिती गठीत करण्यात येईल.

२. सदर समितीच्या शिफारशींच्या आधारे, संस्थेतील प्रशासकीय परिषद (Academic Council) आणि कार्यकारी परिषद (Executive Council) किंवा वैधानिक समिती (Statutory bodies) निवडीसंबंधी निर्णय घेईल.

**(ग) कार्यकाळ :-**

१. नियुक्त "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" यांचा कार्यकाळ सुरूवातीस एका वर्षाकरिता राहील.

२. कार्यरत प्राध्यापकांचा पहिला कार्यकाळ पूर्ण होताना किंवा तद्नंतर मुदतवाढ देतेवेळी संबंधित संस्था मूल्यमापन करुन निर्णय घेईल.

३. प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस म्हणून नियुक्त तज्ञांचे योगदान व मागणीनुसार संबंधित संस्था मुदतवाढ देण्याकरिता स्वतंत्रपणे मूल्यमापन प्रक्रिया ठरवील.

४. सदर मुदतवाढ ही सत्रनिहाय जास्तीत जास्त ३ वर्षांची राहील. अपवादात्मक परिस्थितीमध्ये एक वर्ष अधिकची मुदतवाढ देता येईल. तथापि, कोणत्याही परिस्थितीत एकूण सेवा ४ वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

३. उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील राज्यातील शासकीय शैक्षणिक संस्थामध्ये 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिसेस इन युनिव्हर्सिटी ॲण्ड कॉलेजेस' अंतर्गत नियुक्तीकरीता प्राध्यापक पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | संस्थेचे नाव | प्राध्यापक पदसंख्या | | | १०% प्रमाणे येणारी संख्या | एक सत्राकरिता अंदाजे आर्थिक भार (प्रतिमाह १.५ लाख प्रमाणे) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | भरलेली | रिक्त | | |
| १ | शासकीय विज्ञान संस्था, मुंबई | १० | २ | ८ | १ | रुपये ६,००,०००/- |
| २ | शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, मुंबई | ५ | ० | ५ | १ | रुपये ६,००,०००/- |
| ३ | सिडनहॅम व्यवस्थापकीय व उद्योजकीय शिक्षण आणि संशोधन संस्था, मुंबई | ३ | ० | ३ | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | शासकीय विज्ञान संस्था, औरंगाबाद | ४ | ३ | १ | १ | रुपये ६,००,०००/- |
| ५ | शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, औरंगाबाद | ५ | २ | ३ | | |
| ६ | शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | ८ | २ | ६ | १ | रुपये ६,००,०००/- |
| ७ | शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, नागपूर | ५ | १ | ४ | | |
| ८ | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | १४ | ३ | ११ | १ | रुपये ६,००,०००/- |
| | **एकूण** | **५४** | **१३** | **४१** | **५** | **रु. ३०,००,०००/-** |

४. सदरहू योजनेअंतर्गत नियुक्त करण्यात येणाऱ्या तज्ञांचे मानधन संबंधित संस्थेद्वारे खालील तक्त्यात दर्शविलेल्या लेख्यातून अदा करण्यात येईल :-

| अ. क्र. | संस्था | स्वीय प्रपंजी लेखे |
|---|---|---|
| १ | शासकीय विज्ञान संस्था, मुंबई | संस्थेतील स्वीय प्रपंजी लेख्यातुन |
| २ | सिडनहॅम व्यवस्थापकीय व उद्योजकीय शिक्षण आणि संशोधन संस्था, मुंबई | संस्थेतील स्वीय प्रपंजी लेख्यातुन |
| ३ | शासकीय विज्ञान संस्था, औरंगाबाद | संस्थेतील स्वीय प्रपंजी लेख्यातुन |
| ५ | शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | संस्थेतील स्वीय प्रपंजी लेख्यातुन |
| ५ | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | संस्थेतील स्वीय प्रपंजी लेख्यातुन |

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०१०४१६१०४५६९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2023.01.04 16:13:31 +05'30'

**( प्रताप पां. लुबाळ )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

(१) मा. मंत्री (उ. व तं.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
(२) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
(३) सर्व सह सचिव / उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
(४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
(५) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण (संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्यामार्फत)
(६) सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्यामार्फत)
(७) संचालक, सर्व शासकीय संस्था (संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्यामार्फत)
(८) निवड नस्ती/मशि-१.